वृत्तपत्राचे नांव :– सकाळ

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– नाशिक

वृत्तपत्र पान क्र :– पुरवणी 4

दिनांक :–03/01/2010

**प्रेम-संस्कार**

**प्रेम. हा शब्द अस्तित्वात येण्याआधीपासूनच मानवप्राणी या भावनेशी परिचित आहे. प्रेम या पवित्र भावनेला मानव आदिम काळापासून विविध रूपांत पाहत आला आहे. 'प्रेम करा' हाच साधा-सोपा संदेश जगभरातील विविध धर्म, धर्मग्रंथ देत आले आहेत. जग निर्माण झाले, तेव्हापासून मानवी मनात चालत आलेली ही भावना जगाच्या अंतापर्यंत कायमच राहणार आहे. विविध धर्मग्रंथांनी या नाजूक विषयाकडे कसे पाहिले, अनेकानेक तत्त्वज्ञांनी-कवींनी 'प्रेमा'ची महती कशी गाइली, याची रंजक माहिती वाचा या अनोख्या सदरात...सुरवात करू या ऋग्वेदापासून...**



# ऋग्वेदातील प्रेम

ऋग्वेदाच्या पहिल्याच मंडलातील अग्नीबद्दलच्या ऋचांवरून नुसती नजर फिरविली तरी या ऋचा म्हणजे अग्नीच्या प्रेमात पडलेल्या कवी-ऋषींनी केलेल्या प्रेमकविता वाटाव्यात, इतक्या उत्कट आहेत. त्या अग्नीला प्रियकर, सखा, मित्र मानणाऱ्या तर आहेतच; परंतु कुमारिकांना जसा प्रियकर आणि पत्नीला जसा पती हवाहवासा वाटतो, त्यासाठी जसे प्रियाराधन चालते, तसाच भाव अग्नीबद्दलच्या ऋचांत आहे. अग्नीची रोमांचकारी रूपे पाहताना या कवी-ऋषीला काय वाटले, याचे वर्णन करताना तो म्हणतो :

'जसा धनुर्धराचा बाण
किंवा सेनेची आगेकूच करते भयभीत,
तसाच तूही धावतोस वेगवान होऊन नित्यनूतन रूपे
धारण करीत
रानावनात
परंतु हे अग्ने !
तुझी रोमांचकारी नवजात रूपे
असतात प्रिय
पत्नीला आवडणाऱ्या पतीच्या
अन् प्रेयसीला मोहित करणाऱ्या
प्रियकराच्या रूपासारखीच'

**– डॉ. रावसाहेब कसबे**

'मानव आणि धर्मचिंतन' (सुगावा प्रकाशन)
या ग्रंथातून साभार